**ठळक बातम्या**

- अहमदाबादमधल्या अपघातग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स सापडला, मृतांच्या कुटुंबांना मृतदेह सुपुर्द करण्याची प्रक्रिया सुरू

- नागपूरमध्ये सुमारे ८ हजार कोटी रुपये गुंतवणुकीचा हेलिकॉप्टर उत्पादन निर्मिती कारखाना उभा राहणार

- यंदाचं विश्व मराठी साहित्य संमेलन नाशिकमधे २६ ते २८ डिसेंबर दरम्यान होणार

**आणि**

- राज्यात पुढचा आठवडाभर कोकणात बहुतांश ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी गुजरातमध्ये अहमदाबाद सरकारी रुग्णालयात जाऊन विमान अपघातात जखमी झालेल्यांची भेट घेतली. अपघातातून बचावलेले विमान प्रवासी रमेश विश्वासकुमार यांच्याशी त्यांनी संवाद साधला. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेले गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्या कुटुंबाची भेट घेऊन त्यांनी शोक व्यक्त केला. त्यानंतर मोदी यांनी संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन परिस्थितीचा आणि बचाव कार्याचा आढावा घेतला. अहमदाबादमधल्या या दुर्घटनेचा आपल्या सर्वांना धक्का बसला आहे. इतक्या क्षणार्धात एवढे जीव गमावण्याचं दुःख शब्दात व्यक्त करता येणार नाही. सर्व शोकाकुल कुटुंबांच्या दुःखात आपण सहभागी आहोत, अशी प्रतिक्रिया प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिली आहे.

अहमदाबाद विमानतळावरून लंडनकडे निघालेलं विमान अवघ्या काही क्षणातच विमानतळाजवळ कोसळल्यानं काल हा अपघात झाला. या अपघातात १२ कर्मचाऱ्यांसह २४१ जणांचा मृत्यू झाला. अपघात स्थळावर आजही तपास आणि मदतकार्य सुरू आहे. न्यायवैद्यक तज्ज्ञांनी आज अपघातस्थळी भेट देऊन सविस्तर तपासणी केली. घटनास्थळावर एक ब्लॅक बॉक्स सापडल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून..

***व्हाइस कास्ट***

***विमान दुर्घटनेचं नेमकं कारण अजून पर्यंत कळू शकलेलं नाही. या प्रकरणी आज मेघनी पोलिस स्टेशन मध्ये तक्रार दाखल करण्यात आली. विविध सुरक्षा यंत्रणेचे अधिकारी घटनास्थळी तपास करत आहेत. गुजरात एटीएसनं दुपारी घटनास्थळावरून डिजिटल व्हिडिओ रेकॉर्डर ताब्यात घेतल्याचं वृत्त आहे.  विमान पडलं त्या भागातल्या बेपत्ता असलेल्या स्थानिक नागरिकांचाही शोध सुरू आहे.***

***आकाशवाणी बातम्यांसाठी अहमदाबादहून अपर्णा खुंट***

दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या मृतदेहांची डीएनएच्या मदतीने ओळख पटवण्याचं काम सुरू असून, ओळख पटलेले मृतदेह शवविच्छेदनानंतर कुटुंबांकडे सुपूर्द केले जात आहेत. आतापर्यंत ७ मृतदेह संबंधित कुटुंबांकडे सुपूर्द करण्यात आले आहेत. दरम्यान, अहमदाबादच्या सरकारी रुग्णालयात सध्या ३२ जणांवर उपचार सुरू असून गंभीररीत्या होरपळलेले काही रुग्ण वगळता अन्य सर्वांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. राकेश जोशी यांनी दिली आहे. दुर्घटनेतल्या जखमींचे प्राण वाचवण्याच्या आशेनं अनेक जण रक्तदान करण्यासाठी मोठ्या संख्येनं पुढाकार घेत आहेत. तसंच, अहमदाबाद इथल्या लष्करी छावणीत भारतीय सैन्यानं रक्तदान शिबीर आयोजित केलं आहे. अपघातग्रस्तांच्या कुटुंबांसाठी रस्ते, गृहनिर्माण तसंच वाहतूक विभागाकडून निवास आणि वाहतुकीची व्यवस्था करण्यात आली आहे.

या दुर्घटनेबद्दल देशोदेशीच्या नेत्यांनी शोक व्यक्त केला आहे. दरम्यान, या विमान दुर्घटनेच्या तपासात अमेरिकेच्या राष्ट्रीय वाहतूक सुरक्षा मंडळाचं तपास पथक चौकशीसाठी भारतात दाखल होणार आहे, या तपासात भारतीय अधिकाऱ्यांना हे पथक मदत करणार असल्याचं सुरक्षा मंडळानं समाज माध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

नागपूरमध्ये सुमारे ८ हजार कोटी रुपये गुंतवणुकीचा हेलिकॉप्टर उत्पादन निर्मिती कारखाना उभा राहणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत मॅक्स एअरोस्पेस अँड एव्हिएशन प्रायव्हेट लिमिटेड आणि राज्य शासनाच्या उद्योग विभाग यांच्यात या संदर्भात सामंजस्य करार करण्यात आला आहे. कारखान्याचं प्रत्यक्ष काम २०२६ पासून सुरू होणार आहे. या प्रकल्पामध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या सुमारे दोन हजार रोजगार निर्मिती होणार असून या प्रकल्पात आठ वर्षांमध्ये ८ हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित आहे.

<><><><><>

जनतेला स्वस्त दरात, जास्तीत जास्त वीज उपलब्ध करून देण्याचं शासनाच धोरण आहे. ऊर्जा क्षेत्रातल्या पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी ऊर्जा विभागाने कालबध्द नियोजन करावं, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. मुंबईत  सह्याद्री अतिथीगृहात ऊर्जा विभागाच्या योजनांच्या आढावा बैठकीत ते आज बोलत होते.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना  डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करावी, पीएम सुर्यघर योजनेअंतर्गत राज्यातल्या सर्व शासकीय इमारतींच सौर ऊर्जेव्दारे विद्युतीकरण करावं, वीज गळती कमी करण्यासाठी केंद्र शासनाच्या योजनांची प्रभावी अमंलबजावणी करावी, हायड्रोजन परिसंस्थेच्या विकासाकरता संशोधन

आणि  विकास प्रकल्प, तसंच कौशल्य विकासावर भर देण्यात यावा, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

<><><><>

गुरु तेग बहादूर साहेबजी यांचा ३५० वा शाहिदी आणि गुरुगोविंद सिंगजी यांचे ३५० वा गुरु-ता-गद्दी समागम कार्यक्रमाचं आयोजन राज्यात नांदेड, नागपूर आणि मुंबई या तीन ठिकाणी केलं जाणार आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राज्य शासन संपूर्ण सहकार्य करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

<><><><>

नाशिक इथं २६ ते २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत विश्व मराठी संमेलन होणार आहे, अशी माहिती मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज दिली. या संमेलनानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येईल. यासाठी विविध समित्या गठित केल्या जातील. या संमेलनाचं कार्यालय नाशिक इथं १६ ऑगस्ट पासून कार्यान्वित होईल. या संमेलनात पुस्तक आदान- प्रदानाचा उपक्रम असेल.

<><><><>

व्हॉट्सऍप द्वारे गुंतवणुकीवर आकर्षक परताव्याच आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या सायबर टोळीत सामील असलेल्या एका व्यक्तीला सीबीआयने अटक केली आहे. कल्याणमधून अटक केलेल्या या व्यक्तीकडे अनेक सिमकार्ड आणि बनावट बँक खात्यांची कागदपत्रं सापडली आहेत.  सायबर फसवणुकीसाठी त्यांचा वापर होत होता. सायबर गुन्ह्यांविरुद्धच्या ऑपरेशन चक्र-५ या मोहिमेअंतर्गत सीबीआयनं मुंबई, पुणे, नाशिक, दिल्ली, हिसार आणि लखनौमध्ये छापे टाकून अनेक बनावट कागदपत्रं आणि डिजिटल पुरावे हस्तगत केले आहेत.

<><><><>

विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि भयमुक्त शिक्षण देण्याच्या उद्देशानं यूजीसी, अर्थात विद्यापीठ अनुदान आयोगानं लागू केलेल्या रॅगिंगविरोधी नियमांचं पालन न केल्याबद्दल देशातल्या ८९ शैक्षणिक संस्थांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. यामध्ये आयआयटी मुंबई, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ आणि पुण्यातलं स्पायसर ॲडव्हेंटिस्ट विद्यापीठ यांचा देखील समावेश आहे. यूजीसीनं २००९ साली रॅगिंगविरोधी नियमावली लागू केली असून ती सर्व विद्यापीठं आणि महाविद्यालयांवर बंधनकारक आहे. मात्र, काही नामांकित संस्थांनी देखील या नियमांकडे दुर्लक्ष केल्याचं यूजीसीच्या रॅगिंग विरोधी निरिक्षण समितीच्या अहवालात आढळलं आहे.

**<><><><><>**

अहिल्यानगर जिल्ह्यात शनिशिंगणापूर देवस्थानातल्या १६७ कर्मचाऱ्यांना गैरवर्तन आणि अनुपस्थिती या कारणामुळे कामावरून काढून टाकल्याची माहिती देवस्थानच्या विश्वस्तांनी दिली आहे.

**<><><><><>**

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या कृषी कार्यालयाच्या पथकानं राहुरी तालुक्यातल्या पाथरे खुर्द इथं विनापरवाना खत विक्री करणार्या एका दुकानावर छापा टाकला. त्यात सुमारे साडे ७ लाख रूपये किमतीचा अनधिकृत खत साठा जप्त केला आहे. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

**<><><><><>**

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात काल पासून पावसाला पुन्हा सुरुवात झाली आहे. गेल्या २४ तासात जिल्ह्यात ७१ मिमी पावसाची नोंद झाली. त्यात देवगड तालुक्यात सर्वाधिक १६६ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. कणकवली तालुक्यात कळसुली

इथं ओढ्यात वाहून गेल्यानं एकाचा मृत्यू झाला, तर  परुळे इथं एका घरावर झाड पडून मोठं नुकसान झाल्याची माहिती प्रशासनाने  दिली आहे.

**रत्नागिरी** जिल्ह्यात पावसाला पुन्हा सुरुवात झाली असून, काल रात्रीपासून त्याचा जोर वाढला आहे.

**<><><><><>**

राज्यात पुढचा आठवडाभर कोकणात बहुतांश ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. कोकण किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे. येत्या १८ आणि १९ तारखेला कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी खूप जोरदार पाऊस पडण्याची शक्यताही हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**